# बीड नगरपालिकेतील वादग्रस्त लेखापाल गणेश पगारेची तडकाफडकी जिंतूरला बदली

## लेखापाल पगारेचा भ्रष्ट कारभार लवकरच चव्हाट्यावर दैनिक सरकार आणणार

बीड (सरकार): बीड नगर पालिकेतील लेखापाल यांच्यावर भ्रष्टाचाराचे झालेले आरोप , लोकप्रतिनिधींशी झालेली बाचाबाची आणि नगर पालिकेत इतर अधिकाऱ्यांशी संगनमताने झालेला भ्रष्टाचार पाहता लेखापाल गणेश पगारेंची तडकाफडकी परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यात बदली करण्यात आली आहे. त्यामुळे आता गणेश पगारे यांनी बीड नगर पालिकेत काय काय केले? कसे केले? कोणते नातेवाईक हाताशी धरले, कोणत्या अधिकाऱ्याशी संगनमत केले . या सर्व गोष्टीचा पोलखोल दैनिक सरकार करणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बीड नगरपालिकेत ठाण मांडून बसलेले लेखापाल गणेश पगारे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप मोठ्या प्रमाणात झाले. चौकशी लागली , आणखीन चौकशी चालू आहे. मात्र गंभीर बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी बाहेर गेल्यानंतर पुन्हा बीड नगरपालिकेत येऊन आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला . नगरपालिकेतील सफाई कामगारांचे प्रकरण , नातेवाईकांच्या नावाने पगारी उचलण्याचा आरोप त्याच बरोबर अजिंक्य ट्रेडर्सच्या नावाने चाललेला कारभार या सर्व गोष्टी डोळ्यासमोर असताना तडकाफडकी गणेश पगारेची बदली परभणी जिल्ह्यातील जिंतुर येथे करण्यात आली आहे. त्यामुळे आता गणेश पगारे यांनी बीड नगर पालिकेत काय कारनामे केले, कसे केले, कोणाच्या संगनमताने केले . आणि कोणी पाठीशी घातले या सगळ्या गोष्टीचा पोलखोल होणार आहे. नगरपालिकेत सर्व कागदपत्रांचा ताळमेळ जुळून येणार आहे आणि बीड नगरपालिकेचा भ्रष्ट कारभार आणि या भ्रष्ट कारभारामुळे आणखी किती अधिकारी गोत्यात अडकतात हे आता लवकरच दिसून येणार आहे.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar





बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २१५ वा ■ मंगळवार २२ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २३ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 215 ■ Tuesday 22 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा,विम्यासह नुकसान भरपाई मिळणार

### मंत्रीमंडळ बैठकीत मोठा निर्णय

मुंबई (सरकार): मंत्रीमंडळ बैठकीत आज महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये मत्स्यव्यवसायाला आता शेतीचा दर्जा दिला जाणार आहे. मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांसाठी हा महत्वाचा निर्णय मानला जात आहे. शेतीप्रमाणे मत्स्य व्यवसायीकांना देखील आता नुकसानभरपाई मिळणार आहे. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या विभागाचा मोठा निर्णय मानला जात आहे.



दरम्यान, मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा दिल्यामुळं शेतीप्रमाणे मस्त्य व्यवसायालाही विमा, नुकसानभरपाई आणि इतर योजनांचा मिळणार लाभ मिळणार आहे. कोकण किनारपट्टीतील मत्स्य व्यवसायीकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यातील मत्स्यव्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा मिळण्याचे संकेत देण्यात आले होते. याबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी वित्त विभागाकडे पाठवण्यात आला होता. हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर अंतिम मान्यतेसाठी ठेवला जाणार असल्याचे सांगण्यात आले होते. यानंतर आज अखेर मत्सव्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्य सरकार आणि केंद्र सरकारतर्फे शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध योजना आणि इतर लाभ यापुढे मच्छिमारांनाही मिळणार आहेत.

### आहेरवाहेगावात आठ जणांवर कोयत्याने हल्ला; ५ जण गंभीर जखमी

बीड (सरकघार): गेवराई तालुक्यातील आहेरवाहेगाव येथे जुन्या वादामुळे आठ जणांवर कोयता, टांबी आणि रॉडने हल्ला करण्यात आला. ही घटना १६ एप्रिल रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात पाच जण गंभीर जखमी झाले. तर तीन जण किरकोळ जखमी झाले आहेत. पोलिसांनी ५ दिवसांनंतर जखमींचे जबाब नोंदवले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गंभीर जखमींपैकी मोहम्मद खान पठाण यांच्या डोक्यात ४८ टाके पडले आहेत. सर्व जखमींवर सध्या बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गावातील जुन्या भांडणाचा राग काढत आरोपींनी एका कुटुंबावर कोयता, रॉड आणि टांबीसारख्या धारदार व घातक हत्यारांनी जबर मारहाण केली. या घटनेमुळे बीड पुन्हा हादरलं आहे. या हल्ल्यात चाँद इस्माईल (वय -२५ वर्षे), इस्माईल मोहम्मद खान पठाण (वय -६५ वर्षे), मोहम्मद खान पठाण (वय -७० वर्षे), फारूख मुसा पठाण (वय - ३० वर्षे), मन्ना पठाण (वय -२८ वर्षे) हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच पठाण इस्माईल, शमीना इस्माईल पठाण, मुमताज फारूख पठाण हे तिघे किरकोळ जखमी झाले आहेत. दरम्यान या हल्ल्याच्या घटनेला पाच दिवस उलटून गेले आहेत. सोमवारी (२१ एप्रिल ) सायंकाळी सातच्या सुमारास गेवराई पोलिसांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमींचे जबाब नोंदवले. त्यामुळे पोलिसांच्या सतर्कतेविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. आरोपींचा तपास कधी लागणार आणि त्यांना कोणती शिक्षा दिली जाणार, हे पाहावं लागेल. बीड जिल्ह्यातील हत्या आणि मारहाणीच्या घटनांचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळे बीडमधली वाढती गुन्हेगारी कशी कमी करावी, हे सध्या इथल्या पोलिसांसमोरचं मोठं आव्हान आहे.




## संपादकीय

# काश्मीरची ढगफुटी : मानवजातीला इशारा

काश्मीरमध्ये गेले दोन दिवस पावसाने हाहाकार माजवला आहे आणि असे वाटते आहे की, निसर्गाचा कोप काश्मीरवर प्रलय ओढवत आहे. शनिवारी भूकंपाचा हलका धक्का बसला आणि हे नुकसान कमी होते की काय म्हणून दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी रामबन येथे ढगफुटीने कहर केला. त्यात दोन मुले दगावली. हे नुकसान किरकोळ वाटत असले तरीही त्याची व्याप्ती मोठी आहे आणि हा निसर्गाचा इशारा आहे. पाऊस आणि वादळी वारे यामुळे जीवनाची गती हरवली आणि दुपारचा अंधार भीतीदायक होता असे तेथील वृत्ते सांगतात. वाऱ्याचा वेग अतिशय भयानक होता आणि लोक अक्षरशः दहशतीत होते. हवामानातील बदल हा लोकांसाठी धोक्याचा इशारा होता आणि तो वाटतो त्यापेक्षा जास्त काही तरी त्यात होते. हा इशारा असा आहे की, आम्हाला त्यात यात काहीतरी गंभीर गोष्ट घडली आहे याचा इशारा आहे. आणि याचे परिणाम सतत पृथ्वीवर राहणार आहेत. आणि या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणे इथून आम्हाला परवडणार नाही असा गर्भितार्थ त्यात दडला आहे.

ज्या पद्धतीने हवामानाचा हा इशारा काश्मीरच्या जनतेवर परिणाम करत आहे, त्यावरून एक बाब स्पष्ट होते की केवळ त्वरित कृती करणे आवश्यक तर आहेच. पण झाडांच्या फांद्या आणि इलेक्ट्रिक वायर्स यामुळे रहदारीला प्रचंड धोका आहे. संबंधित विभागाने रिस्क ऑडिट म्हणजे धोक्याचे ऑडिट करणे तातडीने करणे गरजेचे आहे. जे अधिकारी याला जबाबदार असतील त्यांना तातडीने त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे. दुसरे क्षेत्र धोक्याचे आहे, ते म्हणजे सातत्याने होणाऱ्या लँडस्लाईड्स म्हणजे भूस्खलन. या धोक्यापासून तातडीने उपाय शोधण्याची गरज आहे आणि त्यासाठी हा धोका कमी करण्याचे उपाय शोधण्याची गरज आहे. ही योजना जितक्या लवकरात लवकर अमलात आणली जाईल तितके ते चांगले आहे. हवामान बदल ही सर्वात महत्त्वाची आणि अत्यंत गंभीर असे संकट आहे. यापासून वाचण्यासाठी तातडीने उपाय शोधण्याची गरज आहे. निसर्गाची हानी करण्याचे पाप मानव जातीने केले आहे आणि त्याचे परिमार्जन करण्याचा एकच उपाय आहे तो म्हणजे पर्यावरणाचा आदर बाळगून निसर्गाची जास्तीत जास्त जपणूक करणे हाच आहे. काश्मीरचे झाले आणि महाराष्ट्राचे येत्या काही दिवसांत राज्यात पावसाचे आगमन होणार आहे. येथेही पावसाने हाहाकार पूर्वी माजवला आहे आणि भविष्यात तो माजवणार आहे. यासाठी राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने तातडीने अगोदरच उपाययोजना करायला हवी. पर्यावरणाचे नुकसान करण्याचे पाप होता कामा नये असे आपण म्हणतो पण तसे प्रत्यक्षात करत नाही. कारण पर्यावरणाचे नुकसान करायचे ते करतोच. त्यामुळे निसर्ग एक दिवस आपल्याला जबरदस्त शिक्षा देतो.

ती मग कधी माळीणची दुर्घटना असो की आणखी कोणती. यात हानी मनुष्याचीच होते आणि निसर्ग आपला रूद्रावतार दाखवून शांत होते. काश्मीरमध्ये जे घडले आहे ते याच प्रकारचे आहे आणि मानवजातीच्या दुर्लक्षाचे फलस्वरूप आहे. काश्मीरमध्ये जे घडले त्याचे वर्णन डेथ, डिस्ट्रक्शन आणि उरलेले डेब्रीस यात करता येईल. तुफानी पाऊस आणि वादळी वारे यामुळे रामबन जिल्ह्यातील डोंगर तसेच त्यांच्या जोडीला भूस्खलन यामुळे विनाशाची अशी लाट आली की क्षणात होत्याचे नव्हते झाले. ४० हून अधिक घरे कोसळली. हा निसर्गाचा इशारा आहे आणि तो जर मानवजातीने समजून घेतला नाही, तर भविष्यातही असेच अनर्थांना समोरे जावे लागणार आहे. तज्ज्ञांनी रामबन जिल्ह्यातील या अनर्थाला कारण येथे सुरू असलेले अव्याहत आणि अवैज्ञानिक उत्खनन आणि जंगले नष्ट होण्याचे प्रकार यांना जबाबदार धरले आहे. त्यामुळे श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्ग यावर जंगल सपाटीकरणामुळे हा अनर्थ ओढवला आहे असे लोकांचे म्हणणे आहे. आता यातही विकासाचा कोन आहेच.

जे देशभरात आहे तेच या राज्यातही आहे. येथे विकासाचा समतोल राखण्यासाठी येथे जंगले काही प्रमाणात नष्ट करणे आवश्यक आहेत. पण ते किती प्रमाणात करायची याला काही मर्यादा आहे. भूवैज्ञानिक दृष्ट्या तरुण असलेले पर्वत भुईसपाट केले जात आहेत आणि त्यामुळे त्यांची पाणी अडवण्याची क्षमता संपुष्टात येते. त्यामुळे सर्वत्र हाच प्रश्न आहे. निसर्ग हवा तर पर्यावरणाला जपले पाहिजे. नियोजन करताना या मुद्याचा बारीकसारीक विचार व्हायला हवा होता. पण राज्यकर्त्यांनी ते केले नाही हे आपण जाणतोच. त्यामुळे मानवजात आज संकटात आहे. आता जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गाचे संचालक म्हणतात की आम्ही या भागाचे भू-सर्वेक्षण केले होते. पण आज परिणाम आज त्याच्या अगदी उलट आला आहे. ही अशी संकटे नेहमीच येत जाणार आहेत आणि ती महाराष्ट्रात जशी येणार आहेत तशी ती काश्मीरमध्ये येणार आहेत आणि ती उत्तराखंडमध्यही येणार आहेत. हा निसर्गाचा इशारा मानवाने काळजीपूर्वक तपासून त्यावर अंमलबजावणी केली पाहिजे. अन्यथा काश्मीर ज्याला आपण पृथ्वीवरचे नंदनवन म्हणतो ते एकदिवस उजाड होईल आणि काश्मीरला दहशतवाद्यांनी जसे बरबाद केले तसेच ते आपल्या चुकीमुळे निसर्गही करेल. यावर वेळीच उपायकरण्यात आला पाहिजे. हवामानातील बदलामुळे मानवजातीवर भयानक संकट आले आहे आणि ते तामिळनाडूवर जसे आहे तसेच ते काश्मीरवरही आहे. आणि महाराष्ट्रावरही आहे. त्यामुळे हवामानाचा नवा पॅटर्न लक्षात घेऊन आपण तातडीने पावले उचलावीत हे आपल्या हिताचे आहे. उद्या महाराष्ट्रावरही हीच वेळ येणार आहे. त्यामुळे आज काश्मीर संकटात आहे, तर उद्या आपण तेथेच असू. याचा

# पारंपरिक नऊवारचे ऐतिहासिक महत्व

नऊवारी साड्या ही महाराष्ट्रीय वारसाची भारताला मिळालेली एक अभिमानास्पद देणगी आहे. नऊवारी साडी ज्याला 'काष्टा' किंवा 'लुगडे' साडी म्हणूनही ओळखले जाते, ही एक पारंपरिक महाराष्ट्रीय साडी आहे जी एका अनोख्या पद्धतीने नेसली जाते. इतिहासाची पाने राणी ताराबाई, राणी लक्ष्मीबाई सारख्या पराक्रमी विरांगणांच्या शौर्य गाथांनी भरलेली आहेत; परंतु यांच्यामध्ये एक सामान्य गोष्ट अशी दिसते की, त्यांची वेशभूषा म्हणजेच नऊवारी साडी. नऊवारी साडी (छर्रीीरीळ डरीशश) नेसून युद्धाच्या मैदानात फ्री मुवमेंटसाठी मोकळीक होती. ही साडी महाराष्ट्राची शान आहेच. पण त्याला शक्ती, साहस आणि समानतेच्या प्रतीकाच्या रुपात पाहिले जाते. याला अखंड वस्त्र असेही म्हटले जाते. कारण याच्यासोबत अन्य वस्त्र परिधान करण्याची गरज भासत नाही. जुन्या काळात नऊवारी साडी ट्राउजरसाठी नेसली जायची. मात्र काळानुसार त्यात बदल होताना दिसून आला. नऊवारीला काष्टी साडी, सकाच्चा आणि लुगडीच्या नावाने ही ओळखले जाऊ लागले. नऊवारी नेसल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य खुलते.

नऊवारी साडी नेसल्यानंतर महिला छान नटून थटून तयार होतात. कोणताही पारंपरिक उत्सव म्हटल की महिला नऊवार ही हमखासपणे नेसतात. महिलांना नऊवारी साडी नेसायला इतकी आवडते की, काहीजणी सहावारी साडीचीच नऊवारी करून नेसतात. हा ट्रेंड सुद्धा मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. बरं इतकंच नव्हे, तर नऊवारी साडीला इतका मान आहे की, बाजारात आता त्याचे अनके प्रकार आणि डिझाइन्स पाहायला मिळतात. आता नऊवार नेसण्यासाठी नेसवणारीची गरज लागतेच बरं का पण ही हौस पूर्ण करण्यासाठी देखील रेडिमेड नऊवारी शिवून मिळते अगदी तुम्हाला पाहिजे तशीच. महाराष्ट्रीय महिलांचा पारंपरिक पोशाख म्हणून याची ख्याती आहे. नऊवार, दागिन्यांचा साज, ठसठशीत नथ, कपाळी चंद्रकोर हेच आहे महिलेचं सौंदर्य. नऊवारी ही फक्त एक फॅशन नसून महाराष्ट्राचा एक पारंपरिक वारसा आहे. आजही महाराष्ट्रीय लोक तो जपतात. या अनोख्या 'काष्टा'चा काय आहे रुबाब? जाणून घेऊया या लेखातून तिचा पारंपरिक इतिहास.

**असा आहे इतिहास :** महाराष्ट्राची ओळख बनललेल्या नऊवारी साडीचा इतिहास फार जुना आहे. सुरुवातीच्या काळात ही साडी धोतीप्रमाणे नेसली जायची. तसेच ती पुरुष आणि महिला सुद्धा नेसायच्या. राजा-महाराजांच्या काळात युद्धाच्या मैदानात जायचे असेल किंवा शस्त्र कला शिकायची असेल तेव्हा महिलांना आरामदायी कपडे घालण्याची गरज होती. पुरुषांच्या धोतीवरून प्रेरणा घेत नऊवारी साडी नेसण्याची सुरुवात झाली. याची खासियत होती की, ती नेसून सहजपणे अस्त्र-शस्त्रचा वापर केला जात होता. साडीचे हे एकमेव रूप आहे, ज्याला मिलिट्री युनिफॉर्म मानले जाते. इतिहासाबद्दल बोलायचे झाल्यास नऊवारी साडी ही कॉटनची बनवली जायची. मात्र काळानुसार ती फ्रॅबिकमध्ये तयार केली जाऊ लागली. कॉटनसह विविध प्रकारच्या सिल्कपासून ती तयार केली जाऊ लागली. सुती नऊवारी ही दैनंदिन कामे करताना फार उपयोगी यायची, तर पूजा-पाठ आणि अन्य विशेष कार्यक्रमांवेळी सिल्कपासून तयार करण्यात आलेली नऊवारी साडी नेसली जाते. यामध्ये लहान-लहान बुट्टी आणि सोनेरी रंगाच्या जरीची विशेष बॉर्डर केलेली दिसते.

**नऊवारीचे ऐतिहासिक महत्त्व :** 'नौवारी' हा शब्द मराठी शब्द 'नौ' पासून आला आहे, ज्याचा अर्थ नऊ आहे, जो साडीच्या नऊ यार्ड लांबीचा संदर्भ देतो. या साडीचा उगम महाराष्ट्रातील मराठा योध्यांपासून होतो. त्या काळातील महिला युद्धादरम्यान आणि दैनंदिन कामांमध्ये हालचाल करण्यास मदत करण्यासाठी धोतरसारखी ही शैली वापरत असत. नौवारी साडी ही केवळ कपड्यांचा तुकडा



नाही, तर महाराष्ट्रीय महिलांच्या ताकदीचे आणि लवचिकतेचे प्रतीक आहे.

**सांस्कृतिक महत्त्व :** महाराष्ट्रात, नऊवारी साडी ही केवळ पोशाखापेक्षा जास्त आहे; ती एक सांस्कृतिक ओळख आहे. विवाहसोहळा, धार्मिक समारंभ आणि गणेश चतुर्थी आणि गुढी पाडवा यासारख्या महत्त्वाच्या जीवनातील कार्यक्रमांमध्ये महिला अभिमानाने ती परिधान करतात. साडी ही राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतिनिधित्व करते, जी पिढ्यानपिढ्या एक प्रिय वारसा म्हणून पुढे नेली जाते.

कारागीर नऊवारी सिल्क साडी बनवण्यासाठी कुशल कारागिरांची आवश्यकता असते ज्यांना विणकामाची गुंतागुंतीची कला समजते. या साड्या बहुतेकदा शुद्ध रेशमापासून बनवल्या जातात. ज्यामध्ये निसर्ग, धार्मिक चिन्हे आणि महाराष्ट्रीय संस्कृतीने प्रेरित असलेल्या विस्तृत आकृतिबंध असतात. प्रामुख्याने पैठण आणि येवला भागातील कारागीर प्रत्येक विणकामात आपले मन आणि आत्मा ओततात. प्रत्येक साडी महाराष्ट्राच्या कापड वारशाची प्रामाणिकता आणि भव्यता प्रतिबिंबित करते याची खात्री करतात.

**नऊवारी कापड आणि डिझाइन :** नऊवारी साड्या पारंपरिकपणे शुद्ध रेशमापासून बनवल्या जातात, ज्या त्यांच्या समृद्ध पोत आणि टिकाऊपणासाठी ओळखल्या जातात. साड्यांमध्ये बहुतेकदा हिरवा, लाल, पिवळा आणि जांभळा असे दोलायमान रंग असतात, जे समृद्धी, आनंद आणि अध्यात्माचे प्रतीक आहेत. बॉर्डर्स आणि पल्लू सामान्यतः जरीकामाने सजवलेले असतात, जे साडीच्या शाही स्वरूपाला जोडतात. नऊवारी साड्यांमध्ये वापरलेले धागे उच्च दर्जाचे असतात, ज्यामुळे साडीची वर्षानुवर्षे चमक आणि मऊपणा टिकून राहतो.

**नऊवारीचे प्रकार :** पूर्वीच्या काळात ब्राह्मणी नऊवारी साड्या मुख्य प्रसंगी नेसल्या जायच्या. ही नऊवारी साडी नेसायची (छर्रीीरीळ डरीशश ढूशी) एक विशिष्ट पद्धत आहे. या नऊवारी साडीचा काठाकडचा भाग, वर कमरेला खोचायचा असतो. ज्याला ओचा असे म्हटले जाते. यामध्ये निऱ्यांचा घोळ सुद्धा जास्त असतो. या साडीमध्ये निऱ्या कमरेला न खोचता त्या एकत्र घेऊन त्याचे 'केळं' काढले जाते. ही साडी साधारणतः पायापर्यंत झाकलेली असली तरी, पोटऱ्यांचा काही भाग उघडा राहतो. नऊवारी साडी नेसण्याच्या पाच सर्वाधिक लोकप्रिय पद्धती आहेत. त्यामध्ये ब्राम्हणी स्टाइल, पारंपरिक मराठी साडी, कोल्हापुरी नऊवारी, पेशवाई साडी, कोळी आणि शेतकऱ्यांची साडी आणि कंटेम्प्ररी मराठी साडी. पण मूळ स्टाइल ही काष्टी. यामध्ये साडीची बॉर्डर मागच्या बाजूला खोचली जाते. काष्टी साडी ही खरंतर कॉटनची बनवण्यात आलेली असते.

# उष्माघात झाल्यावर हे फळ खाल्ल्याने त्वरित आराम

उष्माघात झाल्यास, शरीराला ताबडतोब हायड्रेट करणे आणि गमावलेले इलेक्ट्रोलाइट्स भरून काढणे खूप महत्वाचे आहे. अशा परिस्थितीत, काही फळे नैसर्गिकरित्या या गरजा पूर्ण करण्यास मदत करू शकतात. या फळांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ते आवश्यक पोषक तत्वांनी भरलेले असतात, जे शरीराला थंड करण्यास आणि जलद पुनर्प्राप्ती करण्यास मदत करतात. उष्माघाताच्या बाबतीत फायदेशीर ठरू शकणारी काही फळे येथे आहेत:

**१. टरबूज:** टरबूजमध्ये ९०% पेक्षा जास्त पाणी असते, ज्यामुळे ते डिहायड्रेशनशी लढण्यासाठी एक उत्कृष्ट फळ बनते. हे पोटॅशियम सारख्या नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्समध्ये देखील समृद्ध आहे, जे शरीरात द्रव संतुलन राखण्यास मदत करते. टरबूज खाल्ल्याने शरीर थंड होते आणि तुम्हाला ताजेतवाने वाटते.

**२. खरबूज:** खरबूज हे चांगल्या प्रमाणात पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्सचा एक चांगला स्रोत आहे. त्यात व्हिटॅमिन सी आणि बीटा-कॅरोटीन सारखे अँटीऑक्सिडंट्स देखील असतात, जे शरीराला उष्णतेच्या नुकसानापासून वाचवण्यास मदत करतात. खरबूज हे हलके आणि सहज पचणारे फळ आहे.

**३. संत्री आणि लिंबू सारखी लिंबूवर्गीय फळे:**



संत्री आणि लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. त्यामध्ये भरपूर पाणी असते आणि ते शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात. लिंबू पाणी थोडे मीठ आणि साखर मिसळून प्यायल्याने हरवलेले इलेक्ट्रोलाइट्स पुनर्संचयित होण्यास मदत होते.

**४. आंबा:** आंबा केवळ चविष्टच नाही तर त्यात भरपूर पोषक तत्वे देखील असतात. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि पोटॅशियम सारखे आवश्यक पोषक घटक असतात. आंबा शरीराला ऊर्जा प्रदान करतो आणि ते थंड ठेवण्यास देखील मदत करू शकतो. तथापि, आंब्यामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, म्हणून ते कमी प्रमाणात सेवन करावे.

**५. बेलफळ :** बेल फळ त्याच्या थंड गुणधर्मांसाठी ओळखले जाते. हे पचन सुधारण्यास आणि शरीराला थंड करण्यास मदत करते. उष्माघाताच्या बाबतीत बेल फळच्या रसाचे सेवन खूप फायदेशीर मानले जाते.

**६. केळी:** केळी हे पोटॅशियमचा एक उत्कृष्ट स्रोत आहे, जे उष्माघातादरम्यान नष्ट होते. हे सहज पचणारे फळ आहे आणि शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करते.

**७. द्राक्षे:** द्राक्षांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ते अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. हे शरीराला हायड्रेटेड ठेवण्यास आणि उष्णतेच्या ताणापासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.

**८. काकडी:** काकडी ही एक भाजी आहे पण ती फळासारखी खाऊ शकते. त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ते शरीराला थंडावा देते. काकडीत इलेक्ट्रोलाइट्स देखील आढळतात. उष्माघाताचा त्रास असताना ही फळे खाल्ल्याने शरीर हायड्रेट होण्यास, गमावलेले इलेक्ट्रोलाइट्स भरण्यास आणि शरीर थंड होण्यास मदत होते. तथापि, गंभीर स्थिती असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे खूप महत्वाचे आहे. फळांसोबतच, पुरेसे पाणी आणि इतर द्रवपदार्थांचे सेवन करणे देखील महत्त्वाचे आहे.

# कानदुखी कमी करण्यासाठी आहारात या ७ पदार्थांचा समावेश करा

कानदुखीचा अनुभव खूप वेदनादायक असतो आणि कधीकधी तो असह्य देखील होऊ शकतो. कान दुखण्यामागे अनेक कारणे असू शकतात, जसे की कानात संसर्ग, मेण जमा होणे, सर्दी आणि खोकला किंवा कानाला दुखापत होणे. कानाच्या तीव्र वेदनांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे चांगले असले तरी, काही घरगुती उपाय आणि आहारातील बदल कानाच्या वेदना कमी करण्यास मदत करू शकतात. कानदुखीमध्ये कोणत्या गोष्टी फायदेशीर ठरू शकतात ते जाणून घेऊया.

**१. लसूण :** लसणामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे कानाचे संक्रमण कमी करण्यास आणि वेदना कमी करण्यास मदत करतात. तुम्ही जेवणात लसूण खाऊ शकता किंवा लसणाच्या एक किंवा दोन पाकळ्या तुपात गरम करून त्याच्या तेलाचे काही थेंब कानात टाकू शकता. लसूण तेल संसर्गामुळे होणाऱ्या वेदनांपासून आराम देऊ शकते.

**२. आले :** आले हे नैसर्गिक वेदनाशामक म्हणून देखील ओळखले जाते आणि त्यात दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. कानाच्या दुखण्यापासून आराम मिळविण्यासाठी, आल्याचा रस कानाच्या बाहेर (कानाच्या आत नाही) लावता येतो, त्यामुळे सूज आणि वेदना कमी होतात. याशिवाय, आल्याची चहा पिल्याने शरीरातील सूज कमी होऊ शकते, जी कानदुखी कमी करण्यास मदत करते.



**३ तुळस :** तुळशीला आयुर्वेदात एक महत्त्वाचे औषध मानले जाते आणि त्यात अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म देखील आहेत. तुळशीच्या काही पानांचा रस काढा, तो थोडा गरम करा आणि त्याचे काही थेंब कानात टाका. यामुळे कानाचा संसर्ग कमी होतो आणि वेदनांपासून आराम मिळतो. तसेच, तुम्ही तुळशीचा चहा पिऊ शकता, जो रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतो.

**४ मेथी :** मेथीच्या बियांमध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे कानाच्या संसर्गावर उपचार करण्यास मदत करतात. मेथीचे दाणे हलके बारीक करून पेस्ट बनवू शकता आणि ते कापडात बांधून कानावर लावू शकता. कानदुखी कमी करण्यासाठी हे उपयुक्त ठरू शकते. याशिवाय, तुम्ही तुमच्या आहारात मेथीचे दाणे समाविष्ट करू शकता, ज्यामुळे शरीरातील सूज कमी होते.

**५ गरम पेये :** कानदुखीच्या वेळी हर्बल टी (जसे की पुदिना, कॅमोमाइल किंवा आल्याची चहा) सारखे उबदार पेये पिणे फायदेशीर ठरू शकते. हे पेये घसा आणि नाक साफ करण्यास मदत करतात, ज्यामुळे कानदुखीपासून आराम मिळतो, विशेषतः जर कानदुखीचे कारण सर्दी किंवा खोकला असेल तर.

**६ व्हिटॅमिन सी युक्त फळे आणि भाज्या :** व्हिटॅमिन सी समृद्ध असलेले पदार्थ खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत होते, ज्यामुळे कानाच्या संसर्गाचे जलद उपचार होण्यास मदत होते. संत्री, लिंबू, पेरू आणि पपई यांसारखी फळे खाल्ल्याने शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात आणि शरीर संसर्गाशी अधिक चांगल्या प्रकारे लढू शकते.

**७ कांदा :** कांद्यामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे कानाच्या संसर्गाशी लढण्यास मदत करतात. कांदा बारीक करून त्याचा रस काढा आणि हलका गरम करा. या रसाचे काही थेंब कानात टाकल्याने संसर्गापासून आराम मिळू शकतो. तुमच्या आहारात कांदा, कच्चा किंवा शिजवलेला, समाविष्ट केल्याने देखील कानदुखी कमी होण्यास मदत होऊ शकते.

# तीखट-मीठ लावलेली कैरी खाण्याचे हानिकारक प्रभाव

उन्हाळ्यात अनेकांना कच्चा आंबा खायला आवडतो. त्याची गोड आणि आंबट चव आणि कुरकुरीतपणा यामुळे ते एक स्वादिष्ट आणि ताजेतवाने नाश्ता बनते. ते अधिक मसालेदार बनवण्यासाठी, लोक त्यावर मीठ, तिखट आणि विविध प्रकारचे मसाले शिंपडून खातात. आंबा चवीला छान वाटत असला तरी, अशा प्रकारे खाल्ल्याने काही आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. या लेखात आपण या विषयावर सविस्तर चर्चा करू.

**जास्त मीठ सेवनाचे हानिकारक परिणाम:** आवश्यकतेपेक्षा जास्त मीठ घालून कच्चा आंबा खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. मीठामध्ये सोडियमचे प्रमाण जास्त असते, ज्याचे जास्त सेवन केल्याने खालील समस्या उद्भवू शकतात:

* **उच्च रक्तदाब:** सोडियम शरीरातील पाण्याचे प्रमाण वाढवते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांवर दबाव वाढू शकतो आणि उच्च रक्तदाब होऊ शकतो. त्यामुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका देखील वाढतो.
* **मूत्रपिंडांवर ताण:** शरीरातून अतिरिक्त सोडियम काढून टाकण्यासाठी मूत्रपिंडांना जास्त काम करावे लागते. जास्त काळ मीठ खाल्ल्याने मूत्रपिंडाच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो.
* **पाणी साठणे:** जास्त प्रमाणात मीठ सेवन केल्याने शरीरात पाणी साठून राहू शकते, ज्यामुळे सूज येऊ शकते, विशेषतः पाय आणि हातांमध्ये.
* **पोटात जळजळ:** रिकाम्या पोटी किंवा जास्त प्रमाणात मीठ खाल्ल्याने पोटात जळजळ आणि आम्लता होऊ शकते.

**लाल मिरची पावडरच्या अतिसेवनाचे हानिकारक परिणाम:** आंबा चमचमीत बनवण्यासाठी लोक त्यात भरपूर तिखट घालतात. लाल मिरचीचे मध्यम प्रमाणात सेवन आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते, परंतु त्याचे जास्त सेवन खालील समस्या निर्माण करू शकते:

* **पोटात जळजळ आणि आम्लता:** लाल मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक असतो, जो पोटाच्या आवरणाला त्रास देऊ शकतो आणि आम्लता, छातीत जळजळ आणि पोटदुखी होऊ शकतो.
* **मूळव्याध समस्या:** ज्या लोकांना आधीच मूळव्याधची समस्या आहे, त्यांच्यासाठी लाल मिरचीचे जास्त सेवन

# दररोज रिकाम्या पोटी टोमॅटोचा रस पिण्याचे आरोग्यदायी फायदे



**१. वजन कमी करण्यास उपयुक्त:** टोमॅटोच्या रसात कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते. यामुळे पोट जास्त वेळ भरलेले वाटते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**२. पचन सुधारते:** टोमॅटोच्या रसात फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. यामुळे बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**३. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते:** टोमॅटोच्या रसात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. हे शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत करते.

**४. त्वचा निरोगी ठेवते:** टोमॅटोच्या रसात लायकोपिन असते, जे सूर्याच्या हानिकारक किरणांपासून त्वचेचे रक्षण करते. यामुळे त्वचा चमकदार आणि निरोगी होते.

**५. हाडे मजबूत बनवते:** टोमॅटोच्या रसात व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. यामुळे ऑस्टियोपोरोसिसचा धोका कमी होतो.

**६. हृदय निरोगी ठेवते:** टोमॅटोच्या रसात पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. यामुळे हृदयरोगांचा धोका कमी होतो.

**७. डोळ्यांसाठी फायदेशीर:** टोमॅटोच्या रसात व्हिटॅमिन ए असते, जे दृष्टी सुधारण्यास मदत करते. यामुळे मोतीबिंदू आणि डोळ्यांच्या इतर समस्यांचा धोका कमी होतो. टोमॅटोचा रस कसा प्यावा: * ताज्या टोमॅटोचा रस काढा आणि तो दररोज सकाळी रिकाम्या पोटी प्या. * तुम्ही त्यात थोडे काळे मीठ किंवा लिंबाचा रस देखील घालू शकता. * बाजारात मिळणारा कॅन केलेला टोमॅटोचा रस टाळा कारण त्यात मीठ आणि साखर जास्त असते.

■ मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५

बीड सरकार

पान 3

## विशेष वृत्त

# नागरिकांच्या तक्रारीची माहिती मिळणार व्हॉट्सअपवर

## केज तहसीलदार राकेश गिड्डे यांचा उपक्रम

## वेळेबरोबर आर्थिक भार होणार कमी

**केज (प्रतिनिधी):** विविध कामे आणि अडीअडचणी संदर्भात नागरिकांनी तहसील कार्यालयात अर्ज आणि निवेदन दिल्यानंतर त्यावर काय कारवाई झाली किंवा आपले काम कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती घेण्यासाठी नागरिकांना वारंवार या विभागातून त्या विभागात चकरा माराव्या लागतात मात्र आता उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे आणि तहसीलदार राकेश गिड्डे यांनी नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी तक्रार निवारण करण्यासाठी व्हॉट्सअप नंबर दिला असून त्याद्वारे आता नागरिकांना आपल्या तक्रारी आणि इत्तर माहिती उपलब्ध होणार आहे. तहसील कार्यालय केज जिला बोड अंबाजोगाई विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे आणि तहसिलदार राकेश गिड्डे यांनी शासकीय व निमशासकीय कार्यालयासाठी १०० दिवसांच्या कृती आराखडा अनुषंगाने, जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्या करीता व्हॉट्सअप क्र. ८५३०६०६०८९ दिलेला आहे. या व्हॉट्सअप क्रमांकावर नागरीकांच्या तक्रारी व विविध सेवा विषयक अर्ज तसेच सुचना वेळोवेळी प्राप्त होतात. त्यावर प्रशासना मार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाही बाबत नागरीकांना वेळोवेळी कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. त्यामुळे नागरीकांचा वेळ, पैसा व मजुरी वाया जात असल्यामुळे अधिक सुलभ व गतिमान महसूल प्रशासकीय कामकाजाचा एक भाग म्हणून केज केज तालुक्यातील नागरीकांनी विविध विभागामध्ये दाखल केलेल्या अर्जाची प्रत व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवून, वेळोवेळी आपल्या दाखल अर्जाच्या सद्यस्थितीबाबत पाठपुरावा व अद्यावत माहिती प्राप्त करुन घेवू शकता. तसेच ज्या शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन नसेल त्यांनी कुटुंबातील सदस्यांच्या फोनद्वारे देखील सुविधा मिळू शकते. **– राकेश गिड्डे, तहसीलदार केज.**

# चोरट्यांनी मानकापूर येथे १ लाख ६५ हजारांचा ऐवज लांबविला

**गेवराई (प्रतिनिधी):–** तालुक्याती मानकापूर येथील एका शेतकऱ्याच्या घराचे कुलूप तोडून आतमध्ये शिरलेल्या चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. ही घटना १९ एप्रिल रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान घडली.

भागवत भाऊसाहेब जोगदंड यांचे मानकापूर येथे घर आहे. ते शेती व्यवसाय करतात. दि. १९ एप्रिल रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास चोरट्यांनी भागवत जोगदंड यांच्या घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला, त्यानंतर कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे सोन्याची ६० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत, ७० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र, ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे झुंबर तसेच अन्य दागिने व कपाटात ठेवलेली नगदी ५० हजार रुपयांची रक्कम असा एकूण एक लाख ६५ हजार रुपये किमतीच्या मुद्देमाल चोरून नेला. हा प्रकार समोर आल्यानंतर भागवत जोगदंड यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अजय पानपाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# एनसीसीच्या १६ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड

**बीड (प्रतिनिधी):** येथील के.एस. के. महाविद्यालय बीड हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या भविष्यासाठी नवीन पूर्ण उपक्रम सतत राबवत असते. येथील एन.सी.सी. विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना परिश्रम, अनुशासन, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकता व अखंडते साठीचे सातत्याने प्रशिक्षण दिले जाते. देशाचा एक जबाबदार व सुजाण नागरिक बनण्याचे कार्य सातत्याने या विभागाद्वारे केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रात निवड झालेली आहे. यात आर्मी, नौदल, पॅरा मिलीटरी फोर्स, महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र होमगार्ड सेवा, महाराष्ट्र सुरक्षा बल या क्षेत्राचा समावेश आहे. यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रांजण भरत, देवडकर नितीन, नवले विशाल, सुरेश संतोष, जगताप अभिमान, घोडके स्वप्नील, जाधव दीपक, तिपटे रामेश्वर, तिपटे लक्ष्मण, सुरवसे गोविंद, लांडे विक्रम, उबाळे मुकेश, तोंडे गणेश, माने रमेश, वाघ शंतनू, देवरकोंडे सचिन, इत्यादीचा समावेश आहे. या विभागास व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणास, संस्थेच्या सन्माननीय उपाध्यक्षा प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, कर्नल सुनील बी. रेड्डी यांचे सातत्याने विशेष मार्गदर्शन लाभले.

# कारच्या धडकेत मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**धोंडराई (प्रतिनिधी):** चारचाकी कारच्या धडकेत मोटारसायकल वरील इसमाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १८ शुक्रवार रोजी दुपारी चार वाजेच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग ५२ वर नागझरी शिवारात हॉटेल डिसेंट समोर घडली आहे. या अपघातामध्ये विठ्ठल विश्वनाथ घाडगे (वय ५५) यांचा मृत्यू झाला आहे. विठ्ठल घाडगे हे मोटारसायकल क्रमांक एम. एच १६ ए.के ४२४० वरुन धोंडराई कडे जात असताना राष्ट्रीय महामार्ग ५२ वर नागझरी शिवारात हॉटेल डिसेंट समोर असताना स्विफ्ट कार क्रमांक एम. एच १२ क्यु.टी ७३१६ ही गाडी हाईगाईने व निष्काळजीपणे चालवुन जोराची धडक बसल्याने विठ्ठल घाडगे हे गंभीर जखमी झाले यात त्यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदन गेवराई उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले असून त्यांच्यावर शुक्रवारी रात्री ९ वाजता धोंडराई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. तर याप्रकरणी घाडगे यांच्या मृत्युस कारणीभूत ठरल्याने स्विफ्ट गाडी चालकाविरुद्ध गेवराई ठाण्यात गु.र.नं २५२/२०२५ कलम १०६ (१) १२५ अ २८१ भा.न्या.सं नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस जमादार चंद्रशेन माळी करत आहेत.

# प्रत्येक व्यक्तीने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे : डॉ.तात्याराव लहाने

## माजलगाव शहर पोलिसांच्या कामगिरीबद्दल आयुक्ताचे प्रशस्तीपत्र

**केज (प्रतिनिधी):** स्पर्धेच्या युगामध्ये जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीने ध्येयवादी बनले पाहिजे, तरच आपल्या संकल्पांची सहज प्राप्ती होईल. ज्यांनी आपल्या मनात आशा, विश्वास, प्रयत्न आणि डोळस श्रद्धा बाळगली असेल, अशी माणसंच आपल्या जीवनध्येयाची उंच शिखरं सहज गाठू शकतात. जीवनामध्ये अनेक स्वप्न बघा पण वाटचाल करत असताना टप्प्याटप्प्याने त्याची पूर्तता करा. सध्या या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये व्हाट्सअप, फेसबुक यांच्या वापर मर्यादित केला पाहिजे. अशी साधने आपल्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. त्यामुळे केवळ डोळ्यांचेच नव्हे, तर इतरही आजार उद्भवत आहेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २० एप्रिल वार रविवार पासून स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान मालेला नुकतीच सुरुवात झाली. यावर्षी या व्याख्यानमालेने २५ व्या वर्षात पदार्पण केले. तेंव्हा या




व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, सेवानिवृत्त वरिष्ठ अधिष्ठाता जे. जे. रुग्णालय, मुंबई यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. लहू गळगुंडे, जिल्हा कोषागार अधिकारी बीड हे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितमध्ये सचिन देशपांडे, नायब तहसीलदार अंबेजोगाई, गोविंद अण्णा कद्रे, सामाजिक कार्यकर्ते बीड, नईमोद्दीन इनामदार, संस्थेचे माजी उपाध्यक्ष तसेच जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, संस्थेचे संचालक नारायण अण्णा अंधारे, शाळेच्या मा. वि. च्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, वसंतराव शितोळे, प्राचार्य शंकर भैरट, तसेच संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे गणेश कोकिळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. 'स्वप्न बघा स्वप्न जगा' या विषयावर बोलताना डॉ. तात्याराव लहाने पुढे म्हणाले, जीवनामध्ये परिपक्वहोण्यासाठी संस्कारक्षम शिक्षण घेतले पाहिजे. याप्रसंगी त्यांनी आपल्या जीवनातील काही आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला ते म्हणाले, माझे शिक्षणही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये झाले. जीवनामध्ये आईचे काय महत्व असते, आई म्हणजे समर्पण असे का म्हटले जाते हे त्यांनी उपस्थित श्रोत्यांना आपल्या आईच्या त्यागाबद्दल अत्यंत भावनिक होऊन सांगितले. या क्षेत्रामध्ये कार्य करत असताना बाबा आमटे यांच्याकडे जाऊन तेथील कुष्ठरोग्यावर उपचार केले, तसेच गडचिरोली, मेळघाट इथेही सेवा देण्याची संधी मिळाली. मागील जवळपास २६ वर्षात साडेचार लाख मोफत शस्त्रक्रिया केल्या. तसेच पन्नास लाख याचकांना दृष्टी देण्याचं अलौकिक कार्यही केले. सध्याच्या काळात विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे, डायबिटीज विषयी सांगताना ते म्हणाले, जिभेवर नियंत्रण ठेवा, हृदयाला जपा व किमान तीन किलोमीटर नियमित चाला. कारण शरीर स्वास्थ्य हे निरोगी ठेवणं काळाची गरज आहे असेही त्यांनी सांगीतले.

# घराचे कुलूप तोडून २७ हजारांचे दागिणे चोरले

**धारूर (प्रतिनिधी):** शहरातील उदयनगर भागात २० एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास तीन ते चार चोरट्यांनी घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत धारूर पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी संजीवन महादेव टोणगे यांनी फिर्याद नोंदवली. ते धारूर येथील मतिमंद निवासी विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. दि. २० एप्रिल रोजी पहाटे पावणे दोनच्या सुमारास अनोळखी तीन ते चार चोरट्यांनी घराचा कुलूपकोडा तोडून आतमध्ये प्रवेश कर्ज केला. त्यानंतर चोरट्यांनी सोने व चांदीचे विविध २७ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले, असे तक्रारीत नमूद करण्यात आले असून याप्रकरणी धारुरपोलिसांनी अनोळखी तीन ते चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# आरोग्य सेवा हेच देशसेवेचेच रूपः डॉ.ओमप्रकाश शेटे

**माजलगाव (प्रतिनिधी):** आरोग्याचं क्षेत्र हे देशसेवेच माध्यम आहे, त्याची इंडस्ट्री होऊ देऊ नका असे प्रतिपादन आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. गुरुकृपा शिक्षण समुहाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवात 'सन्मान भूमिपुत्रांचा' कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ. शिवरत्न शेटे, शिल्पा शेटे यांचाही सन्मान करण्यात आला. प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ. प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी, शिवाजी रांजवण, जयदत्त नरवडे, संतोष यादव, अरुण इंगळे, अशोक तिडके, भास्कर शिंदे, प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर, डॉ. यशवंत राजेभोसले आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी सन्मानाला उत्तर देताना ओमप्रकाश शेटे यांनी आयुष्यात पैशापेक्षा नैतिकतेला महत्व देत आलो म्हणून समाजासाठी काही करता आले. सामान्य रुग्णाप्रती असलेल्या तळमळीतून काम करत गेलो, कुटुंबाचे संस्कार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास यातून हे करता आले.



आरोग्य सेवा म्हणजे देशसेवा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे असे सांगतानाच लवकरच या पेक्षाही मोठी जबाबदारी घेऊन' मी पुन्हा येईल' असे सांगितले. आयुष्मान भारत मधील उपचारांचे पॅकेज लवकरच बदलण्यात येतील असा शब्दही त्यांनी दिला. डॉ. शिवरत्न शेटे यांनी शिवराय आणि बाबासाहेब यांच्यातील साम्यस्थळे सांगितली. यावेळी डॉ. प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी, डॉ. प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर यांची समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविकात डॉ. यशवंत राजेभोसले यांनी आयोजनामागची भूमिका मांडत नव्या जबाबदारी नंतर ओमप्रकाश शेटे यांचा मराठवाड्यातील पहिला सत्कार माजलगावात होत असल्याचा आनंद असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन अशोक वांडेकर यांनी केले तर आभार मनोज फरके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग उगले, कपिल डोंगरे, डॉ. रंगनाथ गोळकर, डॉ. युवराज कोल्हे, विकास लांडगे, अमित बिंदू आदींनी परिश्रम घेतले.

# पाण्याचा वापर काटकसरीने करावा : ॲड.मनोज संकाये

**परळी (प्रतिनिधी):** शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांच्या हस्ते झाले. यावेळी सारडगावचे माजी सरपंच आघाव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ॲड मनोज संकाये यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात.





पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना ॲड. मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे. यावेळी अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी, शिवा बडे, बालासाहेब चाटे, प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दारूचे नशेत महिलेला मारहाण करणाऱ्यावर गुन्हा

**माजलगाव (प्रतिनिधी):** तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारात राहणाऱ्या कुशवार्ता रामभाऊ आगे या महिलेस विनाकारण शिवीगाळ करणाऱ्या अनिल अंकुश उंबरे (रा. फुले पिंपळगाव) यास संबंधित महिलेने शिवीगाळ का करतो असे विचारले असता त्याने लाथाबुक्क्याने व काठीने मारहाण केली. महिलेच्या पतीला व मुलाला जीव मारून टाकू अशी धमकी दिली. ही घटना १६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारात घडली. याप्रकरणी २० एप्रिल रोजी महिलेचे फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार राठोड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# स्मार्ट अंगणवाडी योजना कागदावरच! अंबाजोगाई तालुक्यातील स्थिती: निधीच नाही

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):–** सौर ऊर्जेवर चालणारी विद्युत यंत्रणा, ई–लर्निंगची सुविधा, एलईडी टीव्ही, यूएसबी पोर्टल, मुलांसाठी टेबल, खुर्ची, जल शुद्धीकरण यंत्र, इलेक्ट्रॉनिक्स वजन काटे अशी अद्यावत उपकरणे आणि सुविधांनी सुसज्ज अशा स्मार्ट अंगणवाडी तयार करण्याची घोषणा राज्य सरकारने सात वर्षांपूर्वी केली. मात्र, त्यासाठी निधीच उपलब्ध झालेला नाही. यामुळे अंबाजोगाई तालुक्यात अशी सर्व सोयीनियुक्त अंगणवाडी निर्माण होऊ शकली नाही. आता ही घोषणा केवळ हवेतच विरली असून, स्मार्ट अंगणवाडी योजना कागदावरच असल्याचे चित्र आहे. अंबाजोगाई तालुक्यात २५२ अंगणवाडचा कार्यरत असून या अंगणवाड्यामध्ये ८ हजार १२३ बालके





प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

या बालकांना लहापणीच शिक्षणाची चांगली गोडी लागावी आणि अंगणवाड्यांची स्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने आदर्श अंगणवाडी अर्थात स्मार्ट अंगणवाडीची घोषणा केली होती. यातून अंगणवाड्यांना रंगकाम केलेल्या बोलक्या भिंती, अंतर्गत भिंतींवर केलेली सजावट, पाण्यापासून ते आसन व्यवस्थेपर्यंत असणाऱ्या दर्जेदार भौतिक सुविधा, मुलांना खेळण्यासाठी मैदान, बैठे खेळाचे विविध साहित्य असा 'स्मार्ट साज' देण्यात येणार होता. एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी राबवली जाते. या योजनेतून अंगणवाडीतील शून्य ते सहा वर्ष वयोगटांतील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे. या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी अंगणवाडीच्या नावांचे प्रस्ताव सरकारकडे पाठविला होते. मात्र कोणतीही कार्यवाही झाली यामुळे अंबाजोगाई तालुक्यात एकही स्मार्ट अंगणवाडी निर्माण झाली नाही.

# अल्पवयीन मुलीसोबत अश्लिल चाळे; ५ जणांविरूध्द गुन्हा

**बीड (प्रतिनिधी):–** शहरातील पेठ बीड हद्दीतील एका १७ वर्षीय विद्यार्थीनीला उचलून एका खोलीत नेऊन तिच्याशी अश्लिल चाळे केल्याचा प्रकार दि. १७ एप्रिल रोजी घडला. याप्रकरणात पिडितेच्या जबाबावरून पाच जणांविरूध्द पोक्सोसह अन्य कलमांतर्गत पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील १७ वर्षीय विद्यार्थीनी घराकडे जात असताना त्याठिकाणी आलेल्या दोघांनी तिला उचलून त्याच भागातील एका खोलीमध्ये नेले. त्याठिकाणी तिच्याशी छेडछाड करत अश्लिल चाळे केले. पिडितेने दोघांना ढकलून घराबाहेर येत तेथून सुटका कण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्या दोघांच्या घरातील महिलांनी मला पकडून शिवीगाळ करत लाथा– बुक्यांनी मारहाण केली. माझ्या गळ्यातील ओढणी गळ्याभोवती गुंडाळून मला ओढत नेले. आरडा ओरडा केल्यामुळे आजुबाजूच्या लोकांनी मला त्यांच्या तावडीतून सोडवले. घटनास्थळी आईने येऊन जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता त्या दोघांसह त्यांच्या घरातील महिलांनी माझ्या आईला लाथा बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे पिडितेने जबाबात म्हटले आहे. या प्रकरणी पिडितेच्या तक्रारीवरून अजिम शेख अकबर आणि शेख अकबर या दोघांसह तीन महिलांविरूध्द पेठ बीड पोलीस ठाण्यात कलम १७३ (२), ७४, ७५, ७६, ९६, १८९ (२), १९१ (२), ३५२, ३५१ (२) बीएनएससह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

# माजलगावचे ढाबाचालक महादेव गायकवाड खून प्रकरणातील तीनही आरोपी पोलिसांच्या ताब्यात!

माजलगाव (सरकार): माजलगाव येथील गावरान ढाब्याचे मालक महादेव गायकवाड यांचा काल किरकोळ कारणावरून ग्राहकाशी वाद झाला होता. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर महादेव गायकवाड यांना गंभीर दुखापत झाली होती. यात महादेव गायकवाड यांचा सोमवारी पहाटे उपचारादरम्यान मृत्यू झाला. यातील प्रमुख आरोपी असलेले रोहित शिवाजीराव थावरे, ऋषिकेश रमेशराव थावरे, कृष्णा माणिकराव थावरे (सर्व रा. आनंदगाव) यांना मंगळवारी पहाटे आळंदी (पुणे) येथून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी केली.

माजलगाव येथील परभणी रोडवर महादेव गायकवाड यांचे गावरान धाबा नावाचे हॉटेल आहे. या हॉटेलवर रोहित शिवाजीराव थावरे आणि त्याचे इतर दोन मित्र असलेले आरोपी ऋषिकेश रमेशराव थावरे आणि कृष्णा माणिकराव थावरे यांचा हॉटेलचे बिल देण्यावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर बाजूलाच असलेली लाकडी ढिल्पी उचलून



महादेव गायकवाड यांच्या डोक्यात घालण्यात आली. तर महादेव गायकवाड यांचा मुलगा आशुतोष गायकवाड हा देखील या मारहाणीत जखमी झाला. दोघांनाही उपचारासाठी माजलगावच्या संजीवनी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. पैकी महादेव गायकवाड यांचा सोमवारी पहाटे दोनच्या सुमारास मृत्यू झाला. याप्रकरणी आशुतोष गायकवाड यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण ठाण्यात रोहित शिवाजीराव थावरे व अन्य दोन अनोळखी तरुणांविरुद्ध गुन्हा नोंद झाला होता. या घटनेत कृष्णा माणिकराव थावरे आणि ऋषिकेश रमेशराव थावरे यांचा सहभाग निश्चित करण्यात आला होता. त्यावरून पोलिसांनी आज या तिघाही आरोपींना पुण्यातील नगर परिषद चौक आळंदी येथून ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस अंमलदार भागवत शेलार, महेश जोगदंड, तुषार गायकवाड, राजू पठाण, बप्पासाहेब घोडके, सुरवसे, चालक गणेश मराडे यांनी केली.

## सोनोशी ग्रामस्थांची भगवानगडाला ७७ लाख रुपये देणगी जाहीर

भगवानगड (सरकार):श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून



मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे सोनोशी (ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ७७ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### विजय नगर (वैतागवाडी) येथ ह.भ.प.साक्षीताई करडकर यांच्या भागवत कथेचे आयोजन

बीड (सरकार): बीड तालुक्यातील वैतागवाडी, विजय नगर येथे वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह वैशाख शु दिनांक २८ एप्रिल २५सोमवार पासून प्रारंभ होत आहे.

या नाम सप्ताहात काकडा भजन ,गाथा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ तसेच दुपारी २ ते ५ या वेळेत ह भ प भागवत कथा प्रवक्त्या साक्षीताई करडकर आळंदी देवाची यांची सु मधुर भागवत कथा आयोजित केली आहे .याबरोबरच या नाम सप्ताहामध्ये ह भ प गणेश महाराज अस्वले, ह भ प सुरेश महाराज जाधव, ह भ प अच्युत महाराज घोडके, ह भ प अक्षय महाराज पिंगळे, ह भ प अनंत महाराज शिंदे, ह भ प अविनाश महाराज भारती, ह भ प सत्यवान महाराज लाटे यांचे हरी किर्तन सेवा होणार असून ५/५/२५सोमवारी ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे बाबा मठाधिपती नेकनूर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होणार आहे. या नाम सप्ताहात आळंदी देवाची येथील भागवत कथाकर साक्षीताई तुकाराम करडकर यांच्या भागवत कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे या भागवत कथेल तबला साथ योगेश महाराज जोगदंड, शिंथ वादन तुकाराम महाराज करडकर, पॅड रवी चीवडे हिंगोली,गायन पांडुरंग शिंदे यांची आहे.या सर्व नाम सप्ताहातील कार्यकर्माचा व श्रवण भक्ती चा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरीमंडळी व भजनी मंडळ वैतागवाडी, विजय नगर यांनी केले आहे.

## शिवसंग्रामच्या पुण्यातील बैठकीत राज्यस्तरीय सदस्य नोंदणीची सुरवात




पुणे (सरकार): राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, वारंवार कर्जमाफीवर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यांच्या कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासह कृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्राला बिगरशेती क्षेत्राची जोड, कृषी व सहकार विभागातील समन्वय आणि सहकार व महसूल विभागाच्या समन्वयातून खरीप व रब्बी हंगामात १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली.

पुण्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात शिवसंग्राम पक्षाची राज्यस्तरीय बैठक पार पडली. त्यानंतर ज्योती मेटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश चिटणीस योगेश विचारे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, ज्येष्ठ पदाधिकारी शेखर पवार, वसंत पाटील, पी. के. चव्हाण यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्योती मेटे म्हणाल्या, आजच्या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व स्मृतीस्थळ, तसेच पानिपत येथील मराठ्यांच्या शौर्य इतिहासाच्या प्रतिक असलेले स्मृतीस्थळ उभारणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करते.

## राज्यातील मोठ्या हॉस्पिटल मध्ये लवकरच दिव्यांग बांधवाची आरोग्य मित्र म्हणून नियुक्ती होणार

मुंबई (सरकार): आरोग्य सेवेचा लाभ होण्यासाठी आयुष्मान भारतचे पाच लाखापर्यंतचे कार्ड दिव्यांगाना देण्याबाबत आयुष्मान भारतचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेट्टे यांना भेटून डॉ.संतोष मुंडे यांनी निवेदन दिले. राज्यात लवकरच दिव्यांग लोकांसाठी तालुकास्तरीय शिबिरे घेण्यात येणार व अंतर्गत आरोग्य मित्र या पदासाठी मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये दिव्यांगाची भरती सुद्धा करणार व राज्यातील दिव्यांग बांधवासाठी प्रत्येक तालुक्यात आयुष्मान कार्ड वाटपाचे शिबीर घेन्यात येणार असा शब्द आयुष्मान भारत मिशन राज्याचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेट्टे यांनी दिला. दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी आयुष्मान भारतचे पाच लाखापर्यंत चे कार्ड दिव्यांगना देण्याबाबत आयुष्मान भारत चे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेट्टे यांची भेट घेऊन चर्चा केली.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आयुष्मान भारत मिशन अंतर्गत २०१८ मध्ये सुरू केली गेली. आयुष्मान भारत योजनेत केंद्र सरकार गरीब कुटूंब व शहरातील गरीब लोकांच्या कुटूंबांना आरोग्य विमा उपलब्ध करते. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (झचग–ध) अंतर्गत आयुष्मान भारत योजना देशभरात चालवली जात आहे. भारत



सरकारच्या या योजनेंतर्गत देशातील १० कोटीहून अधिक कुटुंबांना लाभ मिळेल. यासाठी तुम्हाला आयुष्मान भारतचे कार्ड बनवू हॉस्पिटलमध्ये ५ लाखांपर्यंत मोफत उपचार मिळवू शकतात. त्यासाठी दिव्यांगाच्या आरोग्य विषयी समस्यायासाठी व आयुष्मान भारत कार्ड दिव्यांग बांधवाना मिळणे बाबत तसेच प्रत्येक तालुक्यात दिव्यांग यांना आयुष्मान भारतचे कार्ड मिळण्यासाठी शिबीर घेण्यात यावे या मागण्यासाठी बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित व आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांची डॉ. संतोष मुंडे यांनी भेट घेऊन निवेदन दिले. तसेच राज्यातील प्रत्येक हॉस्पिटल मध्ये दिव्यांग आरोग्य प्रश्नची हेळसांड होऊ नये म्हणून दिव्यांग आरोग्य मित्रची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे डॉ. शेटे यांनी सांगितले. डॉ संतोष मुंडे हे नेहमीच दिव्यांगासाठी तसेच सर्वसामान्यांच्या मदतीला धावून येणार नेतृत्व म्हणून सर्वत्र परिचित आहे. कुठल्याही गरजूंच्या मदतीला यायचं आणि त्यांना सहकार्य करायचं हेच संतोष मुंडे यांचा तत्व आहे आणि ते कायम याचे पालन करत असतात. दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे सातत्याने दिव्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आग्रही असतात.

## पाणवठ्याच्या दर्जेदार दुरूस्तीची आवश्यकता-डॉ.ढवळे

बीड (सरकार): ऐन उन्हाळ्यात पाण्याअभावी वन्यजीवांचे हाल सुरू असल्याचे गंभीर चित्र पहायला मिळते.वनविभागाकडून वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असुन वन्यप्राण्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरूच असुन त्यांची होणारी ससेहोलपट पाहता वनविभागाने बांधलेल्या कृत्रिम पाणवठ्यात नियमितपणे पाणी सोडावे हि वन्यप्रेमींची अपेक्षा असते. मात्र वनविभागाला याचे गांभीर्य नसुन सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केल्यानंतर आणि याबाबत विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच वनविभागाला जाग येते आणि दुस-या दिवशी कोरड्याठाक पाणवठ्यात पाणी सोडले जाते. त्यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात सामाजिक कार्यकर्ते



यांच्या तक्रारी व दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच जाग येते का?? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्रांतर्गत बेलगाव,पिंपरनई, फुकेवाडी,सोमनाथवाडी लगत असलेल्या वनक्षेत्रात हरिण,मोर, लांडोर,वानर आदि वन्यजीव वास्तव्य करतात.वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने तहानलेले वन्यजीव मानवी वस्ती कडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येते.काही ठिकाणी कृत्रिम पाणवठे कोरडेठाक तर काही ठिकाणी महिनाभरापूर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. त्यामुळे वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यात नियमित पाणीपुरवठा करून शेवाळ साचलेल्या ठिकाणी स्वच्छता करून पिण्यायोग्य पाणी वनविभागाने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी २ दिवसांपूर्वी केली होती.याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर वनविभागाला जाग आली आणि त्यांनी पाणवठ्यात पाणी सोडले.साचलेल्या शेवाळाची साफसफाई केली. वन विभागामार्फत बांधण्यात आलेल्या कृत्रिम पाणवठ्यांची उन्हाळ्यापुर्वी देखभाल आणि आवश्यक त्याठिकाणी दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे. याकडे वनविभागाचे दुर्लक्ष असुन भेगा पडलेल्या,तडे गेलेल्या पाणवठ्याण पाणी टीकुन रहात नाही.वनविभाग वरून सिमेंट आणि वाळुच्या साह्याने भेगा बुजविण्याचा थातुरमातुर प्रयत्न करताना दिसत आहे.मात्र याचा फारसा उपयोग होताना दिसत नाही.त्यामुळे पाणवठा दुरूस्तीची कामे दर्जेदार करण्यात यावीत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

### सौ.के.एस.के. महाविद्यालय बीड एनसीसी च्या १६ विद्यार्थ्यांची एकाच वर्षात विविध क्षेत्रात निवड

बीड (सरकार): सौ.के.एस.के.महाविद्यालय बीड हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या भविष्यासाठी नवीन पूर्ण उपक्रम सतत राबवत असते.येथील एन.सी.सी.विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना परिश्रम, अनुशासन, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकता व अखंडते साठीचे सातत्याने प्रशिक्षण दिले जाते.देशाचा एक जबाबदार व सुजाण नागरिक बनण्याचे कार्य सातत्याने या विभागाद्वारे केले जाते.शैक्षणिक वर्ष २०२४– २५ मध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रात निवड झालेली आहे. यात आर्मी, नौदल,पॅरा मिलीटरी फोर्स, महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र होमगार्ड सेवा, महाराष्ट्र सुरक्षा बल या क्षेत्राचा समावेश आहे. यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रांजण भरत, देवडकर नितीन, नवले विशाल,सुरेश संतोष, जगताप अभिमान, घोडके स्वप्नील, जाधव दीपक,तिपटे रामेश्वर, तिपटे लक्ष्मण, सुरवसे गोविंद, लांडे विक्रम, उबाळे मुकेश, तोंडे गणेश, माने रमेश, वाघ शंतनू, देवरकोंडे सचिन, इत्यादीचा समावेश आहे. या विभागास व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणास, संस्थेच्या सन्माननीय उपाध्यक्षा प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे उपाध्यक्ष डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर,५१ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सुनील बी. रेड्डी यांचे सातत्याने विशेष मार्गदर्शन लाभले.आज महाविद्यालयाच्या वतीने जाधव दीपक ईश्वर यांचा प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उप–प्राचार्य डॉ. संजय पाटील देवळणकर,उप–प्राचार्य डॉ.नारायण काकडे , कार्यालयीन अधीक्षक डॉ. विश्वंभर देशमाने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, एनसीसी प्रमुख कॅप्टन डॉ. बालासाहेब पोटे यांनी सत्कार केला व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी एनसीसी विभागाचे विद्यार्थी ही उपस्थित होते.

## मयत छाया पांचाळ प्रकरणी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्याचे निलंबन करून पिडित कुटुंबियांना शासनाने २५ लाखांची आर्थिक मदत देण्याची मागणी

बीड (सरकार): बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतिसाठी दाखल झालेल्या छाया गणेश पांचाळ वय २५ वर्षे रा.आंबिलवडगाव ता.जि.बीड या महिलेचा प्रसुतीनंतर अतिरक्तस्राव झाल्याने तडफडुन मृत्यू झाला असुन बीड जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची लेखी तक्रार छाया गणेश पांचाळ यांचे बंधू आकाश मिठु कळसकर यांनी बीड शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली असुन संबंधित प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात चौकशी समिती स्थापन करण्यात आली असुन संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे तातडीने निलंबन करण्यात यावे.आठवडाभरात चौकशी अहवाल सादर करण्यात यावा. मयत छाया गणेश पांचाळ यांच्या कुटुंबीयांना



२५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. अन्यथा नेकनुरसह बालाघाट परीसरातील विविध पक्ष संघटना सर्व सामान्य जनतेला सोबत घेऊन जन आंदोलन उभे करण्यात येईल आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक बीड डॉ.संजय राऊत, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,पालकमंत्री बीड अजितजी पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना देण्यात आले आहे.निवेदनावर विश्व कल्याण महिला सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा किस्किंदा पांचाळ , मनोज पांचाळ,सुनिता आगलावे,दिशा आगलावे,कापसे रायचंद,अमर पांचाळ, भिमराव पायाळ, दत्तात्रय पांचाळ, राजु पांचाळ, सुतार सर, बबनराव वाघमारे, सामाजिक कार्यकर्त्या अनिता वाघमारे, प्रविण कोल्हे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने गावातील हनुमंत बालासाहेब मुंडे, गौतम संभाजी रोडे, वैजनाथ सोमीनाथ बहीरे, सुरेश बालासाहेब मुंडे यांच्या मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये आर्थिक स्वरुपाची मदत करण्यात आली. यावेळी से.स.सो. चेअरमन मिनीनाथ दादा फड, रामहरी फड, काँग्रेस नेते प्रकाश मुंडे, बंडू मुंडे, माधवराव मुंडे, गुंडीबा फड, बंडू फड, ग्रा प. सदस्य प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, बाबासाहेब मुंडे, तौफिक कच्छी, महादेव मामा मुंडे, समाधान मुंडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.**

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)